# ११. वाईटातून चांगले



एका गावात दोन शेतकरी राहत होते. त्यांपैकी एक भाऊराव तर दुसरे बाबाराव. भाऊराव मनमिळाऊ आणि प्रत्येकाला मदत करणारे होते. याच्या उलट बाबाराव अहंकारी व भांडखोर स्वभावाचे होते. भाऊरावांना खूप मित्र होते, तर बाबारावांच्या वाटेला कुणी जात नसे. दुर्दैवाने त्या दोघांची शेते शेजारी होती.

गावातले लोक भाऊरावांना म्हणत, 'बाबा रे, त्या तुझ्या शेजाऱ्यापासून सावध राहा. तो फार दुष्ट माणूस आहे. त्याच्याशी कुणी संबंध ठेवत नाही. त्याला कुणी मित्रही नाही.'

त्यावर भाऊराव म्हणायचे, 'काही काळजी करू नका. एक ना एक दिवस असा येईल, की तो दुष्ट माझा मित्र होईल.' त्यांचे ते बोलणे ऐकून सारे हसत असत.

दिवसांमागून दिवस निघून गेले. भाऊराव आणि बाबाराव यांची वृत्ती काही बदलली नाही. एकदा भाऊरावांच्या घरी मुलीचे लग्न होते. सर्वांना निमंत्रणे पाठवण्यात आली. तसेच बाबारावांना देखील निमंत्रण दिले गेले; पण शेजारधर्म म्हणून त्यांनी काही मदत तर केलीच नाही आणि लग्नालाही आले नाहीत.

एकदा बाबारावांचा मुलगा फार आजारी पडला. तेव्हा बाबाराव गावाला गेले होते. त्या गावात मोठा दवाखाना नसल्याने मुलाला तातडीने शेजारच्या गावी दवाखान्यात नेणे गरजेचे होते. मुलाची आई नेणार कशी? त्यातच जोरदार पावसाला सुरुवात झाली. बाबारावांचा स्वभाव माहीत असल्यामुळे कुणीही मदतीला आले नाही. भाऊरावांना जेव्हा ही गोष्ट समजली, तेव्हा ते पावसातही बैलगाडी घेऊन मदतीला आले. मुलाला तातडीने त्यांनी शहरात नेले. शहरातल्या



डॉक्टरांनी मुलावर तातडीने उपचार केले. ते म्हणाले, 'जर या मुलाला दवाखान्यात आणायला थोडा उशीर झाला असता, तर हा मुलगा काही वाचला नसता.' हे ऐकून मुलाच्या आईला मोठा धक्का बसला. तिने भाऊरावांचे आभार मानले.



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून या पाठाचे योग्य गतीने समजपूर्वक प्रकट वाचन व मूकवाचन करून घ्यावे.

गावाहून परत आल्यानंतर जेव्हा बाबारावांना ही घटना समजली, तेव्हा ते हादरले. ज्याच्याशी मी वाईट वागलो, त्यांनीच आपल्या मुलाचे प्राण वाचवले. ही गोष्ट त्याच्या मनाला लागून गेली. भाऊरावांच्या घरी जाऊन त्यांचे आभार मानले आणि हात जोडून म्हणाले, 'मी तुमच्याशी फार वाईट वागलो. मला क्षमा करा.' त्या दिवसापासून ते सर्वांशी प्रेमाने वागू लागले.

**– सुभाषचंद्र वैष्णव**

---

**शब्दार्थ : मनमिळाऊ** – मिळून मिसळून वागणारा. **अहंकारी** – स्वत:ला श्रेष्ठ समजणारा. **वाटेला जाणे** – त्रास देणे. **दुष्ट** – वाईट वागणारा. **वृत्ती** – स्वभाव. **शेजारधर्म** – शेजाऱ्याबरोबर वागणुकीची रीत, पद्धत. **तातडीने** – ताबडतोब. **आभार मानणे** – धन्यवाद देणे.

## स्वाध्याय



**प्र. १. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) भाऊरावांचा स्वभाव कसा होता?

(आ) बाबारावांचा स्वभाव कसा होता?

(इ) भाऊरावांनी सर्वांना कशाची निमंत्रणे दिली?

(ई) बाबारावांच्या मुलाला शहरातील दवाखान्यात का न्यावे लागले?

(उ) डॉक्टरांनी मुलाबद्दल काय सांगितले?

(ऊ) बाबारावांनी क्षमा का मागितली?

**प्र. २. खालील शब्दांच्या योग्य अर्थावर ✓ खूण करा.**

(अ) आभार मानणे.
- (१) नमस्कार करणे.
- (२) पाया पडणे.
- (३) धन्यवाद देणे.

(आ) वाटेला जाणे.
- (१) खोडी काढणे.
- (२) रस्त्याने जाणे.
- (३) धक्का बसणे.

**प्र. ३. खालील शब्दांचे समानार्थी शब्द पाठातून शोधून लिहा.**

(१) सखा –  (२) माफी –  (३) विवाह –

(४) जलद –  (५) स्वभाव –  (६) आवश्यक –

**प्र. ४. खालील विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या लावा.**

| अ गट | ब गट |
|---|---|
| (अ) दुर्दैव | (१) शत्रू |
| (आ) सावध | (२) चांगला |
| (इ) मित्र | (३) सावकाश |
| (ई) वाईट | (४) सुदैव |
| (उ) तातडीने | (५) बेसावध |

प्र. ५. 'धक्का' यासारखे एकच अक्षर एकमेकांना जोडून तयार होणारे शब्द लिहा.

प्र. ६. खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा.

(१) पावसातही (२) भाऊरावाचा (३) गावातला (४) दिवसापासून

प्र. ७. खालील शब्द असेच लिहा.

दुर्दैव, दुष्ट, वृत्ती, लग्न, निमंत्रणे, आमंत्रण, शेजारधर्म, स्वभाव, डॉक्टर, प्राण, गोष्ट, सर्वांशी.

- वाचा व लिहा.

नष्ट, खाष्ट, उष्ट, स्पष्ट, पिष्टमय, वितुष्ट, संतुष्ट, इष्ट, अनिष्ट, क्लिष्ट, चेष्टा, महाराष्ट्र, सौराष्ट्र.

## खेळ खेळूया.

कंसातील अक्षरांचा उपयोग करा. काय म्हणतात सांगा. (च, ध, अ, शि)

(१) मोठ्या बहिणीला म्हणतात – [ क्का ]

(२) श्रीखंड यापासून बनवतात – [ क्का ]

(३) दुसऱ्याला ढकलणे – [ क्का ]

(४) ठसा या शब्दाचा समानार्थी शब्द – [ क्का ]

## आपण समजून घेऊया.

- खाली दोन प्रकारचे शब्दसमूह दिलेले आहेत. त्या शब्दसमूहांपैकी कोणत्या शब्दसमूहावरून अर्थ कळतो ते समजून घ्या.

| शब्दसमूह १ | शब्दसमूह २ | शब्दसमूहाचा अर्थ कळतो तो शब्द |
|---|---|---|
| १. सलमाने जेवण | सलमाने जेवण केले. | केले. |
| २. तो जनाची वाट | तो जनाची वाट पाहू लागला. | पाहू लागला. |
| ३. मी चेंडू | मी चेंडू उडवला. | उडवला. |

दुसऱ्या शब्दसमूहांत कोणती क्रिया झाली हे दाखवणारे शब्द दिले आहेत. उदा., केले, पाहू लागला, उडवला. या शब्दांमुळे वाक्यांचा अर्थ कळतो. **या शब्दांना 'क्रियापद' म्हणतात.**

- खालील वाक्यांतील क्रियापदांना अधोरेखित करा.

(१) सीमा घरात गेली.
(२) ती आईकडे आश्चर्याने पाहतच राहिली.
(३) शाळा भरण्याची वेळ झाली होती.
(४) आम्ही कसे शाळेत येऊ?

- क्रियापदे घालून वाक्ये पूर्ण करा.

(अ) चित्राचा कालच वाढदिवस..........
(आ) बाईंनी रमेशचे कौतुक ..........
(इ) दोघांनी मिळून शिरा ..........
(ई) आईने मावशीला पाणी ..........